# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

-----------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ / चैत्र ३, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

-----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

-----------------------------------

### पुणे (जि.पुणे) शहरातील स्वामीनारायण मंदिर ते नवले उड्डाणपुलाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत

**(१) * २३६२९ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे (जि.पुणे) शहरातील नवले पुलावर दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ रोजी ब्रेक फेल झालेल्या कंटेनरने अनेक वाहनांना धडक दिल्याने भीषण अपघात घडून त्यामध्ये ८ जणांचा मृत्यू व २० ते २५ जण गंभीर जखमी होऊन त्या परिसरात दीर्घकाळ वाहतूक ठप्प झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवले पूल परिसरात यापूर्वीही वारंवार अपघात घडल्यामुळे वाहतूकीच्या दृष्टीने सदर पूल अत्यंत धोकादायक बनल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागल्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्वामीनारायण मंदिर ते नवले पूला दरम्यान उड्डाणपूल (Flyover) उभारण्याची मागणी नागरिकांकडून दीर्घकाळापासून होत असून सदर उड्डाणपुलाचे काम तातडीने सुरू करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर अपघातामध्ये कंटेनर वाहनाची तांत्रिक स्थिती, ब्रेक यंत्रणेची तपासणी, वाहनाची फिटनेस प्रमाणपत्रे व परवाने वैध होते काय यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच नवले पूल परिसरातील वाहतूक कोंडी, जड वाहनांची हालचाल व अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी स्वामीनारायण मंदिर ते नवले उड्डाणपुलाचे काम तातडीने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नवले पूल परिसरात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहतूक शाखा, पुणे मार्फत उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(३) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांच्याकडून रस्त्याचे रुंदीकरण करणे, जंक्शनचे डेव्हलपमेंट करणे व उन्नत पूल (Elevated Flyover) करणे दोन टप्प्यात प्रस्तावित करण्यात आले आहे. याअंतर्गत फेज-२ मध्ये स्वामी नारायण मंदिर ते सनसिटी वारजे पर्यंत उन्नत पूल ( Elevated Flyover) करणे प्रस्तावित आहे.

(४) होय, सदरचे वाहन नियमानुसार क्षमतेपेक्षा ओव्हरलोड नसलेबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांचा अहवाल प्राप्त आहे.

(५) या भागातील अपघात कमी करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, स्थानिक प्रशासन, आरटीओ, ट्राफिक पोलीस इत्यादी मार्फत खालीलप्रमाणे उपाययोजनाची अंमलबजावणी करण्यात येत आहेत :-

i) रम्बलर स्ट्रीप.

ii) वाहने न्यूट्रल मोडवर चालवू नये अशा सूचना देणारे साईन बोर्डस

iii) ताशी ४० कि.मी. वेगमर्यादा फलक

iv) स्पीड कॅमेरे, वेग तपासणी यंत्रणाद्वारे वेगवान वाहनांवर दंडात्मक चलन देण्यात येत आहे.

v) रस्त्याचे रुंदीकरण करणे, जंक्शनचे डेव्हलपमेंट करणे व उन्नत पूल (Elevated Flyover) करणे दोन टप्प्यात प्रस्तावित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### माजलगाव (जि.बीड) येथे पोलीसांच्या संगनमताने वाळूची तस्करी सुरु असल्याबाबत

**(२) * २९०९९ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) येथील शहर पोलिस स्टेशनचे कर्मचारी श्री.अमोल कदम यास वाळुची वाहने सुरळीत चालू ठेवण्यासाठी दरमहा रुपये २० हजार इतक्या रकमेची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांनी दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी त्यांचा मोबाईल जप्त करून तपास करण्यात आला असता, यामध्ये पोलिस स्टेशन प्रभारी अधिकारी यांच्या संमतीने सदर गैरव्यवहार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, पडताळणीअंती करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान दिनांक २८.०१.२०२६ रोजी खाजगी इसम, श्री.तात्यासाहेब आर्डे यांना लाच रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. सदर खाजगी इसम तसेच आलोसे, पोलीस शिपाई या दोन्ही आरोपीतांविरुद्ध माजलगांव शहर पोलीस ठाणे, बीड येथे गु.र.नं २१/२०२६ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७,१२ अन्वये दिनांक २८.०१.२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) आलोसे पोलीस शिपाई, माजलगाव शहर पोलीस ठाणे यांचा मोबाईल जप्त करण्यात आला असून मोबाईलमध्ये वरिष्ठ पोलीस अधिकारी व आलोसे यांच्यात कोणतेही आक्षेपार्ह संभाषण/संदेश झाल्याचे अद्याप दिसून आलेले नाही तथापि, दाखल गुन्ह्याचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे. तपासादरम्यान पुरावे मिळून आल्यास कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी आलोसे यांना दिनांक ३०.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांची उपविभागीय पोलीस अधिकारी, केज यांच्यामार्फत प्राथमिक चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या पुनर्वसन व निवाऱ्यासाठी स्वतंत्र स्थायी प्रकल्प उभारण्याबाबत

**(३) * ३२२३२ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिव्यांग व्यक्तीचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने सन २०१८ मधील दिव्यांग धोरणातील परिशिष्ट अ मधील मुद्दा क्रमांक पाच अंतर्गत दिव्यांगांचे पुनर्वसन करण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील १८ वर्षांवरील मतिमंद (बुद्धीबधित) मुला-मुलींच्या शिक्षणाची मुदत संपल्यानंतर त्यांच्या पुढील पुनर्वसनासाठी व निवासासाठी शासनाचे स्वतंत्र ‘स्थायी प्रकल्प’ (Permanent Rehabilitation Projects) उभारण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वय वर्ष १८ पूर्ण झालेल्या मतिमंद व्यक्तींना त्यांच्या पालकांच्या पश्चात सन्मानाने जगता यावे यासाठी ‘आश्रयगृहे’ (Shelter Homes) आणि ‘कौशल्य विकास केंद्रे’ व पुनर्वसन प्रकल्पांना चालना देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत (NGOs) राबविण्यात येऊन प्रकल्पांना शासनाकडून अनुदान किंवा विशेष अर्थसहाय्य देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिव्यांगांसाठी कायमस्वरूपी "निवासी काळजी केंद्रे" (Residential Care Centres) उभारण्यासाठी प्रस्ताव विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये १८ वर्षांवरील मतिमंद दिव्यांगांसाठी शासकीय निवारा केंद्रे उपलब्ध करुन देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

लाक्षणिक दिव्यांगत्व असलेल्या १८ वर्षावरील निराधार, दुर्लक्षित, बेघर किंवा निष्कासित अशा दिव्यांग व्यक्तींकरीता स्वयंसेवी संस्थांमार्फत “दिव्यांग विशेष गृहे (Persons with disabilities Special Home)” स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

१८ ते ४५ वयोगटातील दिव्यांग व्यक्तींच्या कौशल्य विकासासाठी शासनामार्फत अनुदान तत्वावर “कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र” चालविण्यात येत आहेत. तसेच १८ वर्षावरील दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी विभागांतर्गत अनुदान तत्वावर बालगृहे कार्यरत आहेत.

तसेच, ज्या मानसिक आजारमुक्त व्यक्तींना पुढील उपचाराची गरज नाही किंवा ज्या मानसिक आजारमुक्त व्यक्ती बेघर आहेत किंवा ज्या मानसिक आजारमुक्त व्यक्तींना त्यांचे कुटुंबीय स्वीकारत नाहीत, अशा व्यक्तींकरीता

“पुनर्वसन गृहे योजना” ही योजना राबविण्यास शासन निर्णय दिनांक १ सप्टेंबर, २०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय दिनांक २९ जुलै, २०२४ अन्वये नागपूर, पुणे व ठाणे येथे ३ तर दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ अन्वये ठाणे, नागपूर व पुणे येथे ०५ अशा एकूण ०८ पुनर्वसन गृहांची स्थापना करण्यात आलेली आहे. शासन निर्णय दिनांक १ सप्टेंबर, २०२३ नुसार स्वयंसेवी संस्थेस प्रति लाभार्थी / प्रवेशितास रुपये १२,०००/- इतके सहाय्यक अनुदान देण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे.

(४) व (५) होय हे खरे आहे,

प्रस्तुत प्रकरणी दिव्यांग विशेष गृहे व दिव्यांगांसाठी विशेष काळजी केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील सांताक्रुझ येथील फॉर्च्युन हाईट गृहनिर्माण संस्थेच्या परिसरात पब्लिक विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज महाविद्यालयातील विद्यार्थी अंमली पदार्थांचे सेवन करित असल्याबाबत**

**(४) * ३१९६६ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ येथील यशवंतनगर व वाकोला येथील फॉर्च्युन हाईट गृहनिर्माण संस्थेच्या प्रवेशव्दारासमोर असलेल्या पब्लिक विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थींनी सिगारेट, चरस, गांजा यासारख्या अंमली पदार्थांचे सेवन करुन या ठिकाणाहून ये-जा करणाऱ्या चाळीतील नागरिकांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत असल्याच्या अनेक तक्रारी वाकोला पोलीस स्टेशनमध्ये माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच वेलंकन्नी (एसआरए) गृहनिर्माण संस्थेच्या परिसरापासून चाळींकडे जाण्याऱ्या जागेचा वापर युवक-युवतींकडून अश्लील वर्तन तसेच अंमली पदार्थाचे सेवन करण्यासाठी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकोला पोलीस स्टेशन, सांताक्रुझ (पूर्व) यांचेकडे दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करुन महाविद्यालय परिसरातील अशा घटनांना आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) वाकोला पोलीस ठाणे हद्दीत फॉर्च्युन हाईट गृहनिर्माण संस्थेच्या प्रवेशव्दारासमोर असलेल्या पब्लिक विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज महाविद्यालयातील विद्यार्थी सिगारेट, चरस, गांजा यासारख्या मादक पदार्थांचे सेवन करीत असल्याबाबत फॉर्च्युन हाईट गृहनिर्माण संस्था, वेलंकन्नी एस.आर.एस. गृह नि. संस्था, सिल्वर अपार्टमेंट व गोल्डन अपार्टमेंट, मिरांडा एस.आर.ए. गृह नि. संस्था, कृष्णा गृहनिर्माण संस्था, कार्टलॉन को. ऑप. अपार्टमेंट यांच्या सभासदांच्या सह्या असलेला तक्रार अर्ज स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २०.११.२०२५ रोजीच्या निवेदनासोबत वाकोला पोलीस स्टेशन, सांताक्रृझ (पूर्व) येथे प्राप्त झाला आहे.

(३) उक्त प्रकरणी मा.विधानसभा सदस्य यांचे दिनांक २०.११.२०२५ रोजीचे निवेदन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकोला पोलीस स्टेशन, सांताक्रुझ (पूर्व) यांना दिनांक २८.११.२०२५ रोजी प्राप्त झाले आहे.
(४) पोलीस गस्ती दरम्यान पब्लिक विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज परिसरातील दोन पानटपऱ्यांवर तसेच सदर परिसरात सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्या १० व्यक्तींविरुद्ध COTPA Act २००३ (The Cigarettes and Other Tobacco Products Act) अन्वये दंडात्मक कारवाई केली आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ११० व ११२ अन्वये प्रत्येकी दोन अशा एकूण ०४ व्यक्तींविरूध्द दंडात्मक कारवाई केली आहे.

पब्लिक विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये पोलीस दिदी कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना धुम्रपान व अंमली पदार्थाचे सेवन यामुळे होणारे दुष्परीणाम याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील अनुराज टायरच्या गोदामामधील गॅस रिफिलिंग सेंटरवर पोलीस पथकाने छापा टाकल्याबाबत

**(५) * २३२२१ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील केडगाव बायपास रोड लगत असलेल्या अनुराज टायरच्या गोदामामधील अवैधरित्या टँकरमधून घरगुती गॅस रिफिलिंग सेंटरवर पोलीस पथकाने छापा टाकून गॅस टँकरसह रूपये ४२ लाख इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०८.१२.२०२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील केडगांव बायपास रोड लगत असलेल्या अनुराज टायर पत्र्याच्या गोदामामधे गॅस टँकर मधून गॅस रिफिलिंग करण्याची परवानगी नसतांना, विनापरवाना व निष्काळजीपणे भारत गॅस कंपनीच्या घरगुती गॅस रिफिल करण्याची घटना निदर्शनास आल्याने पोलीस पथकाने छापा टाकुन कारवाई केली आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी गॅस टँकरसह एकूण रु.४१,२६,३३९/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दिनांक ०८.१२.२०२५ रोजी कोतवाली पो.स्टे. येथे गु.र.नं. १११०/२०२५ भा.न्या.सं. कलम २८७, २८८, सह जिवनावश्यक वस्तू कायदा कलम १९५५ चे कलम ३, ७, सह एल.पी.जी. (पुरवठा आणि वितरण नियमन) आदेश २०० चे कलम ३(१) (b) सह स्फोटके अधिनियम १८८४ चे कलम ९(b) प्रमाणे एकूण ६ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरच्या गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली होती, सध्या ते न्यायालयीन जामीनावर आहे व उर्वरित दोन आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर आहे.

सद्य:स्थितीत सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे, चौकशीअंती सबळ पुराव्यांसह आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील नायगाव (टिवरी) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे जमिनीचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * ३०६८२ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील नायगाव (टिवरी) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे तत्कालीन दुय्यम निबंधक (Sub-registrar), तहसिलदार आणि तलाठी यांनी शासकीय नियमांचे उल्लंघन तसेच भूमाफियांना मदत करून सुमारे ६५ एकर जमिनीचा रूपये १००० कोटी इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नायगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केल्यानंतर महसूल कर्मचाऱ्यांनी रद्द झालेल्या आणि कालबाह्य झालेल्या मुखत्यारपत्रांच्या (Power of Attorney) आधारे जमिनीचे फेरफार (Mutation) करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महसूल कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यासाठी शासनाने विशेष चौकशी समिती (SIT) स्थापन करुन संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह बनावट नोंदी झालेल्या जमिनींचे सात-बारा उतारे पुन्हा मूळ मालकाच्या नावे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) धनश्री डेव्हलपर्सचे संचालक श्री.शंकरराव बोरकर व त्यांचा मुलगा यांच्या मालकीच्या नायगांव (पूर्व) मौजे टिवरी, ता.वसई जिल्हा पालघर येथील एकूण ६५.३३ गुंठे एकर जमीनीच्या बनावट कागदपत्रांचा वापर करुन आरोपीने सदर जमिनीचे नोंदणीकृत खरेदीखत स्वतःच्या तसेच इतर ०२ कंपन्याच्या नावे केले. सदर खरेदी प्रक्रिया निबंधक नोंदणी कार्यालय, वसई-२, वसई पश्चिम, जिल्हा पालघर येथे खोटी माहिती देवून करण्यात आली आहे. याप्रकरणी नायगाव पोलीस ठाणे, पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर वसई-विरार येथे दि.०४.०२.२०२६ रोजी गु. र. क्र.१२७/२०२६ बी.एन.एस.एस. कलम ३१८(४), ३१६(५), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(१), ३३९, ३(५) अन्वये ०४ आरोपी व त्यांना सहाय्य करणारे इतर यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात तत्कालीन तहसिलदार व तलाठी यांनी महसूली नियमाचे उल्लंघन केलेले नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांच्या दि.२६.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणी २ आरोपी यांनी बनावट पॉवर ऑफ ॲटर्नी बनवून ती खरी असल्याचे भासवून सदर व्यवहार केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याचबरोबर प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन अधिकारी यांच्या सहभागाबद्दल तपास सुरु आहे.

(३) सदर गुन्ह्यात ०२ आरोपींना अटक करण्यात आले आहे. ०२ आरोपींना अटक करण्याची प्रक्रिया सुरु आहे विविध कायदयांन्वये, नोंदणी करार कायदा (रजिस्ट्रेशन ॲक्ट) तसेच विविध महसुली अधिनियमांच्या अधीन राहून संबंधीत प्रकरणाचा तपास सुरु आहे. यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालय व विविध विभागांकडून जारी करण्यात आलेल्या विविध आदेशांची एकत्रीतरित्या विचार करुन तत्कालीन अधिकारी व महसुली कर्मचारी यांचे सहभागाबद्दल तपास सुरु आहे. तपासअंती कोणाचा सहभाग निष्पन्न झाल्यास संबंधीतांवर कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये विविध कंपन्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(७) * ३०७८६ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये सिस-पे, ग्रो-मोअर, ग्रो-इन्व्हेस्टर या कंपन्यांच्या माध्यमातून जादा परताव्याचे आमिष दाखवून सर्वसामान्य ठेवीदारांच्या ठेवींमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला असून याप्रकरणातील आरोपींनी परदेशात पलायन केले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त आरोपींना देशात परत आणण्याबाबत तसेच अन्य फरार आरोपींना पकडून त्यांच्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच सर्वसामान्य ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळवून देण्यासंदर्भात शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अहिल्यानगर जिल्हयामध्ये सिस्पे फिनोवेल्थ इंडिया प्रा. लि., ग्रो-मोअर इन्व्हेस्टमेंट फायनान्स, ग्रो-इन्व्हेस्टर, इन्फीनाइट बिकन इंडिया प्रा. ली., ट्रेडझ इन्व्हेस्टमेंट प्रा.ली. व मास्टरसिनर्जी एज्युटेक एलएलपी या कंपन्यांनी ज्यादा परतावा देण्याचे आमिष दाखवून सर्वसामान्यांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले तदनंतर गुंतवणूक केलेले पैसे परत न करता ठेवीदारांची आर्थिक फसवणुक केली आहे.

त्यानुषंगाने ठेवीदरांच्या फिर्यादीवरून अहिल्यानगर जिल्हयातील शिर्डी, राहता, श्रीगोंदा, श्रीरामपूर तालुका व अहिल्यानगर शहरातील पोलीस ठाण्यांमध्ये मिळून एकूण ०७ गुन्हे भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३(५), ६१ (२), ३१६ (२), ३१६ (५), ३१८(२) व ३१८ (४) सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तिय सस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम च्या कलम ३ व ४ अन्वये दाखल केले आहे. सदर गुन्हयांमध्ये मिळून एकूण ४५७ गुंतवणूकदारांची रु. ६०,९३,३४,४८५/- एवढया रकमेची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

एकूण ७ गुन्हयांपैकी श्रीगोंदा पोलीस स्टेशन गु.र.क्र. ६७३/२०२५, तोफखाना पोलीस स्टेशन गु.रं.न ७२१/२०२५, सुपा पोलीस स्टेशन गु.रं.नं.२९०/२०२५, राहता पोलीस स्टेशन गु.रं. नं.२७३/२०२५, शिर्डी पोलीस स्टेशन गु.र.क्र.७२६/२०२५ या गुन्हयांचा तपास पुर्ण करुन अटक केलेल्या आरोपीविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहे. उर्वरीत आरोपीविरुध्द पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. इतर दोन गुन्ह्यामध्ये तपास सुरु आहे.

सिस्पे कंपनीच्या विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात ७ आरोपी परदेशात पळून गेले असल्याबाबत तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे. भारत देश सोडुन गेलेल्या आरोपीतांविरुध्द गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे व केंद्रीय गुप्तचर यंत्रणा यांचे मार्फत रेड कॉर्नर नोटिस जारी करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे फसवणुक करणाऱ्या कंपन्यांचे बँक खाते, आरोपींचे बँक खाते, फसवणुक करणाऱ्या कंपनीचे एजंटस यांचे बँक खाते गोठविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी ग्रो-मोअर इन्व्हेस्टमेंन्ट फायनान्स कंपनीच्या मालमत्ता जप्त करुन सक्षम प्राधिकारी यांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यानुषंगाने अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बुलढाणा, वाशिम व धाराशिव जिल्ह्यात अवैध गुटखा विक्री सुरु असल्याबाबत**

**(८) * २३५०४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा), कारंजा व मानोरा (जि.वाशिम) व धाराशिव जिल्हयात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या गुटखा विक्री व वाहतूक होत असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच धाराशिव जिल्ह्यात सन २०२४ ते माहे जानेवारी, २०२६ या कालावधीत अवैधरित्या गुटखा विक्री होत असल्याने दाखल केलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने सुमारे ३ कोटी पेक्षा जास्त किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याचे दिनांक ६ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात मध्य प्रदेश, कर्नाटक व तेलंगणा या सीमावर्ती राज्यातून ट्रकद्वारे बेकायदेशीररित्या गुटखा आणला जात असून शाळा व महाविद्यालयासारख्या प्रतिबंधित भागात विकला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गुटख्याची तस्करी करणाऱ्या संघटित गुन्हेगार टोळ्यांवर कायदेशीर कारवाई करुन पोलीस प्रशासन मार्फत २४ तास कडक तपासणी, रात्रीच्या वेळी विशेष पथक तैनात करून गुप्तचर यंत्रणेच्या गुटखा तस्करींला आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) खामगाव (जि.बुलढाणा) येथे शासनाने प्रतिबंधित केलेला व मानवी आरोग्यास अपायकारक असलेल्या गुटख्याची वाहतूक केल्याबाबत खामगाव येथे माहे डिसेंबर, २०२५ व माहे जानेवारी, २०२६ मध्ये एकूण ३ आरोपींविरुध्द दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण रु.४०,८०,४८०/- इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वाशिम जिल्ह्यामध्ये कारंजा व मानोरा परीसरात शासनाने प्रतिबंधित केलेला व मानवी आरोग्यास अपायकारक असलेल्या गुटख्याची विक्री व वाहतूक होत असल्याबाबत दिसून आले नाही.

धाराशिव जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा वाहतूक केल्याबाबत पो.स्टे. आनंद नगर, जि. धाराशिव येथे दिनांक ०६.०१.२०२६ रोजी दोन आरोपींविरुध्द एक गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात एकूण रु.३३,९५,८८०/- इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) धाराशिव जिल्ह्यात सन २०२४ ते माहे जानेवारी, २०२६ या कालावधीत अवैधरित्या गुटखा विक्री करणाऱ्यावर कारवाई करुन एकूण रु.३,६८,४६,८५८/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

| सन | दाखल गुन्हे | उघड | आरोपी | एकूण हस्तगत मुद्येमाल |
|---|---|---|---|---|
| **२०२४** | १९ | १९ | २८ | २,२५,६७,६८८/- |
| **२०२५** | ५३ | ५३ | ६९ | १,०८,४२,६९२/- |
| **जाने. २०२६** | ०६ | ०६ | ०६ | ३४,३६,४७८/- |

(३) दिनांक २०.०१.२०२६ रोजी पो.स्टे. खामगाव येथे दाखल अप. क्र.१९/२०२६ मधील आरोपी मध्यप्रदेश राज्यातील आहे. तसेच, दिनांक ०६.०१.२०२६ रोजी धाराशिव येथे दाखल गु.नं.०४/२०२६ मधील आरोपी कर्नाटक राज्यातील आहे.

शाळा व महाविद्यालयासारख्या प्रतिबंधित भागात प्रतिबंधित अन्नपदार्थाची विक्री होत असल्याची बाब आढळून आली नाही.

(४) चोरुन लपून अवैधरित्या गुटखा विक्री व वाहतूक करतांना मिळून आलेल्या इसमांवर वेळीच कायदेशीर कारवाई करण्यात येते.

गुटखा विक्री टाळण्यासाठी सिमावर्ती भागात रात्रीच्यावेळी नाकाबंधी करुन त्यांच्यावर कारवाई केली जाते.

स्थानिक गुन्हे शाखा यांच्या मार्फतीने विशेष मोहिम राबवून गुटखा व अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यावर वेळोवेळी कारवाई केली जाते.

अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यात अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थाच्या उत्पादन, साठा, विक्री, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये व राज्यातून), वितरण करण्यास दिनांक २०.०७.२०१२ पासून दरवर्षी १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिबंध घालण्यात येत आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत दिनांक १६.०७.२०२५ चे आदेश लागू असून त्यानुसार, गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थ या अन्न पदार्थाची उत्पादन, विक्री, वितरण, साठा, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये व राज्यातून) करणाऱ्या व्यक्तिवर नियमितपणे कारवाई करण्यात येते. त्यानुसार, सन २०२१ ते सन २०२५ अखेर पोलीस प्रशासनाकडून करण्यात आलेल्या कारवाईची संख्यिकीनिहाय माहिती खालीलप्रमाणे :-

| वर्ष | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी | प्रतिबंधक कारवाई |
|---|---|---|---|---|
| **२०२१** | २६९७ | २६९४ | ३९३४ | १५५७ |
| **२०२२** | २३८७ | २३७८ | ३३३२ | १३९७ |
| **२०२३** | ३४७७ | ३४६९ | ४३९४ | २३११ |
| **२०२४** | २७८४ | २७७७ | ३६६८ | २०१५ |
| **२०२५** | २४३८ | २४१४ | ३१७३ | १७०६ |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इचलकरंजी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील बहुमजली इमारतीमध्ये वीज जोडणी करण्याकरीता लाच मागितल्याबाबत

**(९) * ३११४३ श्री.विलास भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील बहुमजली इमारतीमध्ये वीज जोडणी करण्याकरीता रुपये ९० हजार लाचेची मागणी करून रुपये ३० हजार लाच स्वीकारताना महावितरणचे कार्यकारी अभियंता यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंत्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करुन त्यांना निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच सदर प्रकरणामुळे महावितरणमधील अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी वीज जोडणी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी श्री.प्रशांत ताराचंद राठी, कार्यकारी अभियंता, इचलकरंजी यांना कंपनीच्या सेवेतून त्वरीत निलंबित करण्यात आले असून, शिस्तभंग कार्यवाही अंतर्गत आरोपपत्र बजावण्यात आले आहे व विभागीय चौकशी करीता चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. चौकशीची प्रक्रिया सुरु आहे.
(४) वीज जोडणी प्रक्रियेत गतिमानता व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने महावितरणने स्वयंचलित प्रणालीचा अवलंब करण्यास दिनांक ०१/०१/२०२६ पासून सुरुवात केली आहे. दिनांक ०१/०१/२०२६ ते दिनांक २७/०२/२०२६ या कालावधीत नवीन स्वयंचलित प्रणालीचा १,२१,५६८ ग्राहकांनी लाभ घेतला असून त्यांना वीज जोडणी दिली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक जिल्ह्यातील बसस्थानकांची झालेली दुरवस्था

**(१०) * २३११३ श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्रीमती सई डहाके (कारंजा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.देवेंद्र कोठे (सोलापूर शहर मध्य), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: ठाणे, रायगड, चंद्रपूर, बुलढाणा, सोलापूर, लातूर, वर्धा, परभणी, नागपूर, वाशिम, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, धाराशिव तसेच मराठवाडा व विदर्भातील नवीन बसस्थानक किंवा स्वतंत्र बस आगार सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी सन २०२५ व २०२६ या वर्षात शासनाकडे वेळोवेळी निवेदने सादर केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यांत विविध बसस्थानके व आगारांमध्ये बसेसची संख्या अपुरी असून अनेक बसेस नादुरुस्त व कालबाह्य अवस्थेत असल्यामुळे नागरिक, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विशेषतः शाळा व महाविद्यालयांच्या वेळेत विद्यार्थ्यांसाठी पुरेशा बसेस उपलब्ध नसल्याने त्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असून अनेक वेळा बसेस अधिकृत थांब्यांवर थांबत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाला असून अनेक बसस्थानके व आगारांमध्ये अस्वच्छता, दुर्गंधी, पिण्यायोग्य पाणी उपलब्ध नसणे, स्वच्छतागृहांची व प्रतिक्षालयाची कमतरता तसेच अनधिकृत फेरीवाले यांचा मोठ्या प्रमाणावर वावर असल्याने प्रवासी वर्गाला होत असलेल्या त्रासाबद्दल नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी माहे जानेवारी, २०२६ मध्ये शासनाकडे अनेक तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यातील मोठ्या प्रमाणावर १० वर्षांपेक्षा अधिक जुन्या, कालबाहय झालेल्या तांत्रिकदृष्ट्या अयोग्य बसेस अद्याप प्रवासी सेवेत कार्यरत असून त्यामध्ये वारंवार ब्रेक निकामी होणे, इंजिन बिघाड, टायर फुटणे इत्यादी गंभीर प्रकार घडत असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित आगार व्यवस्थापक, आगारप्रमुख व अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा बसेस सेवेतून वगळून नवीन बसेस उपलब्ध करून देण्यासाठी व इतर सोईसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२) व (३) रा.प.महामंडळाकडून उपलब्ध बसेसचे नियोजन करुन विदयार्थ्यांकरीता शाळा व महाविद्यालयांच्या वेळेनुसार फेऱ्या चालविण्यात येत आहेत. अधिकृत बस थांब्यावर बस न थांबल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर अशा तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते. एखाद्या मार्गावर विद्यार्थी संख्या जास्त असल्यास अतिरिक्त बसेसची व्यवस्था करण्यात येते. तसेच शालेय तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

प्रवासी जनतेस स्वच्छ, सुंदर व निर्जंतुक बसस्थानके, बसेस, प्रसाधनगृहे, प्रवासी प्रतिक्षालये इ. आस्थापना वापरता याव्यात याकरिता रा.प.महामंडळाच्या बसेस, बसस्थानक, बसस्थानकावरील स्वच्छतागृहे / फिरते स्वच्छतागृहे (पोर्टेबल टॉयलेट) व प्रवाशांसाठी सोईसुविधा उपलब्ध करुन स्वच्छता व देखभाल करण्याकरिता बाह्यसंस्थेची ई-निविदा प्रक्रियेद्वारे नियुक्ती करण्याची प्रक्रिया रा.प.महामंडळामार्फत सुरू आहे.तसेच नाथजल पाणीबाटली विक्रीकरीता उपलब्ध केलेली आहे. तसेच बसस्थानकांवरील उपहारगृह तसेच स्नॅकबार या अस्थापनामधून प्रवासी जनतेस मोफत पाणी उपलब्ध आहे.

अवैध फिरते विक्रेते आढळल्यास त्यांच्यावर तातडीने कार्यवाही केली जाते.
(४) वाहनांचे जास्तीत जास्त आयुर्मान १५ वर्षे इतके निश्चित केलेले असल्याने महामंडळातर्फे वाहनांचे आयुर्मान १५ वर्षे होण्याआधीच वाहने मोडित काढण्यात येतात. माहे डिसेंबर, २०२५ अखेर महामंडळाच्या वाहन ताफ्यात स्वमालकीची १४,९३८ वाहने समाविष्ट आहेत. सदर वाहनांचे सरासरी वर्षामधील आयुर्मान ९ वर्षे ३ महिने इतके आहे. वाहन देखभालीचे नियतकालीक कार्यक्रम करून वाहने सुस्थितीत ठेवण्यात येतात.
(५) व (६) रा.प.महामंडळात स्वमालकीच्या साध्या २५१८ बसेस प्राप्त झाल्या असून, स्थानिक लोकप्रतिनिधी यांची मागणी व आवश्यकतेनुसार आगारांना/ विभागांना बसेस वाटप करण्यात आल्या आहेत. तसेच भविष्यात स्वमालकीच्या ३००० व ५००० साध्या बसेस घेणेबाबतची कार्यवाही अंतीम टप्प्यात आहे.

----------------

## पुणे (जि.पुणे) शहरातील नद्यांतील प्रदूषणात वाढ झाल्याबाबत

**(११) * २५५०१ श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे (जि.पुणे) शहरातील मुळा-मुठा नदीत सांडपाण्याबरोबरच अनेक कारखान्यांकडून रसायनयुक्त पाणी सोडले जात असल्याने या दोन्ही नद्या दूषित झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरात दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे ९०० दशलक्ष लिटर सांडपाण्यापैकी केवळ सुमारे ६०० दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात असून उर्वरित सांडपाणी प्रक्रिया न करताच नद्यांमध्ये सोडले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुठा नदीतील प्रदूषित पाण्याचा उपयोग हवेली, दौंड व इंदापूर तालुक्यातील १०० पेक्षा अधिक गावांमध्ये सिंचनासाठी होत असल्यामुळे शेती नापिकी होत असून नदीतील विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण धोकादायक पातळीपर्यंत कमी झाल्यामुळे जलचर, पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नदीकाठच्या गावांतील कूपनलिका व विहिरींमध्ये या दूषित पाण्याचा निचरा होऊन नागरिकांना गॅस्ट्रो, विषमज्वर, कॉलरा, पोटाचे विकार तसेच कर्करोगासारखे गंभीर आजार उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुळा–मुठा, पवना व इंद्रायणी नद्यांच्या प्रदूषणमुक्तीकरिता, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) कार्यान्वित करण्यासाठी तसेच पीएमआरडीए कडून सादर करण्यात आलेल्या डीपीआर व नदी सुधार प्रकल्पांना (NRCD/अमृत-२ योजना अंतर्गत) मंजुरी देण्यात येणार आहे काय, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन नदी स्वच्छता, सांडपाणी प्रक्रिया, ऑक्सिजन पातळी सुधारणा व दीर्घकालीन संरक्षणासह “River Rejuvenation Master Plan” मंजूर करून सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची (STP) क्षमता वाढवण्यासाठी कोणती कार्यवाही व उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार पुणे शहरातील मुळा-मुठा नदीत सांडपाण्याबरोबरच कारखान्यामधून रसायनयुक्त पाणी सोडले जात असल्याचे निदर्शनास आले नसल्याचे कळविण्यात आले आहे.

(२) पुणे महानगरपालिका हद्दीतून सुमारे ९८० दशलक्ष लिटर घरगुती सांडपाण्याची निर्मिती होते. त्यासाठी एकूण ४८० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या क्षमतेचे एकूण ११ घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयत्रणा उभारण्यात आलेल्या असून त्याद्वारे ४८० दशलक्ष लिटर प्रति दिन घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येत असून उर्वरित अंदाजे ५०० दशलक्ष लिटर प्रति दिन सांडपाणी विना प्रक्रिया मुळा-मुठा नदीत मिसळते. त्यानुषंगाने राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत मुळा-मुठा नदी, पुणे प्रदूषण कमी करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे.

(३) व (४) माहे जानेवारी, २०२५ पासून नदीच्या पाण्याची गुणवत्ता तपासणीचे अहवाल अवलोकन केले असता, माहे मार्च, एप्रिल, मे या महिन्यामध्ये मुळा, मुठा, मुळा-मुठा ह्या नद्यांच्या पाण्यामध्ये काही प्रमाणात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्याचे आढळून येते. तथापि, ऑक्सिजनचे प्रमाण धोकादायक पातळीपर्यंत कमी झाल्यामुळे जलचरांवर विपरित परिणाम झाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्याबाबत सहायक आयुक्त मस्त्यव्यवसाय, पुणे यांनी दि.२४.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.

तसेच तालुका कृषी अधिकारी, दौंड व इंदापूर यांच्या दि.२८.०२.२०२६ रोजीच्या व तालुका कृषी अधिकारी, हवेली यांच्या दि.१७.०३.२०२६ रोजीच्या अहवालानुसार प्रदूषित पाण्याच्या वापरामुळे शेती नापिक झाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे कळविण्यात आले आहे.

तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्या दि.२४.०२.२०२६ रोजीच्या अहवालानुसार नदीचे पाणी थेट पिण्यासाठी वापरले जात नसून नदीकाठच्या गावांमध्ये दैनंदिन सर्वेक्षणामध्ये व बाह्यरुग्ण विभागामध्ये किरकोळ रुग्ण संख्या वगळता जलजन्य साथीचा उद्रेक नसल्याचे कळविले आहे.

(५) व (६) राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेतंर्गत पुणे शहरातील मुळा मुठा नदी संवर्धन करण्याचा रु.९९०.२६ कोटी इतक्या रकमेच्या प्रस्तावास केंद्र शासनामार्फत JICA चे सहाय्य घेऊन दिनांक १४/०१/२०१६ रोजी मंजूरी मिळालेली असून त्यात केंद्र शासनाचा हिस्सा ८५% (रु.८४१.७२ कोटी) असून पुणे महानगरपालिकेचा १५% (रु.१४८.५४ कोटी) हिस्सा आहे. यापैकी केंद्र शासनाच्या हिश्यापैकी अद्यापपर्यंत प्राप्त एकूण रु. ६२१.४५ कोटी इतका निधी पुणे महानगरपालिकेस वितरीत करण्यात आलेला आहे. या निधीतून ११ सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम (३९६ MLD) प्रगतीपथावर आहे. सदर सांडपाणी प्रक्रिया केंद्र पूर्ण झाल्यावर नदीच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल. पुणे शहरातील नव्याने समाविष्ट केलेल्या २३ ग्रामपंचायतीसाठी २०१ एमएलडी क्षमतेने ८ एसटीपी उभारणे प्रस्तावित आहे.

राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त इंद्रायणी नदी व पवना नदी संवर्धनाचा अनुक्रमे एकूण रक्कम रूपये १७९७ कोटी व रुपये ११७१ कोटी इतक्या रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल दि.११/०८/२०२५ रोजी राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय, केंद्रीय जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांना पाठविण्यात आला. तदनंतर केंद्र शासनाने विचारणा केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक माहिती/प्रस्ताव केंद्र शासनास दि.१७.१२.२०२५ रोजी सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर (जि.लातूर) वसतिगृहात विद्यार्थ्यांचा खून झाल्याबाबत

**(१२) * ३२१९९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये तृतीय वर्षात शिकत असलेल्या एका विद्यार्थ्याचा दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान खून झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात एका सराईत गुन्हेगाराचा समावेश असून, त्याला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीच पाचारण केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लातूर शहरात मागील १५ दिवसांत ४ खून आणि ७ कोयता हल्ले झाले असून, शहरात 'कोयता गँग'ची दहशत निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने लातूर शहरातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी 'मोक्का'(MCOCA) अंतर्गत कारवाई किंवा सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच शासकीय शिक्षण संस्थांच्या आवारात बाहेरील गुन्हेगारांचा वावर रोखण्यासाठी शासनाने 'सुरक्षा ऑडिट' (Security Audit) यंत्रणा राबविण्यासह मृत विदयार्थ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत आणि या प्रकरणाचा खटला 'फास्ट ट्रॅक' (Fast Track Court) न्यायालयात चालविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुरणमल लाहोटी शासकिय तंत्रनिकेतन, लातुर येथील वसतीगृहात राहणाऱ्या फिर्यादी व त्यांच्यासोबतच्या इतर विद्यार्थांचा दुचाकीच्या करण्यात आलेल्या नुकसानीवरुन अन्य इसमांसोबत दिनांक १६.०२.२०२६ रोजी वाद झाला. या वादाचा राग धरुन त्या इसमांनी वसतीगृहातील ज्या विद्यार्थांसोबत वाद झाला त्यांना मारहाण व चाकुने इजा केली. या मारहाणीत श्री.विक्रम पांचाळ या विद्यार्थाचा मृत्यू झाला आहे.

दि.१७.०२.२०२६ रोजी या घटनेबाबत पो.स्टे. शिवाजीनगर येथे गु.र.नं.६५/२०२६ भा.न्या.सं. कलम १०३(१), १०९(१), ५४, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्ह्यातील सर्वच ५ आरोपींना तात्काळ अटक करण्यात आली आहे.

(२) उपरोक्त गुन्ह्यातील आरोपींपैकी एका आरोपीवर यापुर्वी पो.स्टे. भोसरी, पुणे येथे गु.र.नं. ७२२/२०२५ भा.न्या.सं. कलम ११८(२) अन्वये गुन्हा दाखल आहे.

(३) लातूर शहरात माहे जानेवारी, २०२६ ते दिनांक १३ मार्च, २०२६ या कालावधीत एकुण ५ खुनाच्या घटना घडलेल्या आहेत. या ५ गुन्ह्यातील सर्व आरोपींना पोलीसांनी तात्काळ अटक केलेली आहे. तथापि, जिल्ह्यात कोयता गँग अथवा इतर कोणत्याही गँगची दहशत नाही.

(४) लातूर शहरात घडलेल्या घटनांच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करुन सर्व ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस अधिक्षक कार्यालय, लातूर येथे प्रतिबंधक सेल तयार करण्यात आले असून त्यामार्फत शहरातील व जिल्ह्यातील गुन्हेगारांची यादी तयार करुन त्यांच्याविरुध्द प्रभाविपणे मोक्का व हद्दपारीच्या कार्यवाही करण्यात येत आहे.

माहे जानेवारी, २०२६ ते आजपर्यंत शहरातील गुन्हेगारी कमी करण्याच्या दृष्टीने एमपीडीए अंतर्गत ०२ कारवाया करण्यात आल्या आहेत व म.पो.का कलम ५५, ५६, ५७ अन्वये २८७ हद्दपारीच्या प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे. तसेच नाकाबंदी, कोम्बींग ऑपरेशन, पायी पेट्रोलिंग, वाहन तपासणी व QR कोड आधारीत पेट्रोलिंग कार्यान्वीत करण्यात आली आहे.

(५) सद्य:स्थितीत सदरच्या गुन्ह्याचा पोलीस तपास सुरु आहे. तपासानंतर खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच शासकीय संस्थाच्या वसतीगृहांमध्ये घडणाऱ्या दुर्देवी घटनांच्या पार्श्वभुमीवर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिनांक २८.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे शासकिय वसतीगृहांच्या सुरक्षेचा निरंतर आढावा घेण्यासाठी सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांच्या अध्यक्षतेखाली वसतीगृह सुरक्षा समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील वणी व झरी परिसरातील कोळसा व अन्य खाणींमुळे प्रदूषणात झालेली वाढ

**(१३) * २९४८१ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील वणी व झरी परिसरातील कोळसा व अन्य खाणींच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्रदूषणामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील उत्खननामुळे अतिउच्च दर्जाच्या (हायपावर) अवैध स्फोटकांचा वापर, नियमास डावलून करण्यात येणाऱ्या स्फोटांमुळे जमिनीच्या पाणी पातळीत फरक पडून घट होत असल्याची तक्रार करण्यात येत असून स्थानिकांच्या घरांचे नुकसान व जीवित हानी होण्याचा धोका वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त खाणीसाठी वापरण्यात येणारी स्फोटके लावण्याची नियमावली असताना जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ यांच्या संगनमताने अतिउच्च दर्जाची (हायपावर) स्फोटके वापरली जात असून याप्रकरणी तक्रार करूनही संबंधितांविरूद्ध कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त खाणीद्वारा शासनास प्राप्त होणारे महसुली उत्पन्न व प्रत्यक्षात होणारे उत्खनन यामध्ये प्रचंड प्रमाणात तफावत असल्याने या प्रकरणी आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) यवतमाळ जिल्ह्यात वणी व झरी परिसरात पर्यावरण अनुमती घेऊन, कार्यरत असलेल्या केवळ खाणीमुळे होणाऱ्या प्रदुषणामुळेच या भागातील नागरिकांना श्वसनाचे आजार झाले आहेत, असे नसून, त्यास अन्य घटकही कारणीभूत असू शकतात, असे जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. तसेच याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) आयआयटी (बीएचयु) यांच्या वैज्ञानिक अभ्यास अहवालातील शिफारशी, स्फोटके कायदा (Explosive Act) व खाण सुरक्षा निदेशालय, यांचे मार्गदर्शक सूचनानुसार कंट्रोल ब्लास्टिक (Control Blasting) तंत्राचा वापर करुनच खनिजाचे उत्खनन करणे बंधनकारक असून, त्याप्रमाणेच खाणपट्टाधारकाकडून उत्खनन केले जाते. खनिज उत्खननामुळे घरांचे नुकसान अथवा जीवित हानी झाल्याबाबत कोणतीही तक्रार प्रशासनाकडे प्राप्त झालेली नाही. वणी येथे १२ व झरीजामणी येथे ०८ कायमस्वरुपी असलेल्या निरीक्षण विहीरीमधून जिल्हा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत माहे जानेवारी, २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पाणीपातळीच्या नोंदीनुसार, मागील पाच वर्षाच्या पाणी पातळीच्या सरासरीशी तुलना केली असता, वणी परीसरात १.३७ मीटर व झरी जामणी परिसरात ०.८० मीटर इतकी पाणी पातळीमध्ये वाढ आढळून आलेली आहे. पाणी पातळी कमी झाल्याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) खाण सुरक्षा महानिदेशालय (DGMS), भारत सरकार यांच्यामार्फत प्रमुख खनिजांच्या खाणींमध्ये स्फोटके वापरण्यासाठी ब्लास्टींगची परवानगी दिली जात असल्याने, खाणीतील स्फोटांची परवानगी व विनियमन याबाबतचे कोणतेही अधिकार, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना नसल्याने अशा प्रकरणात कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) पर्यावरण विभागाकडील मंजूर पर्यावरण अनुमतीतील खनिज उत्खनन क्षमतेच्या आधारे, इंडीयन ब्युरो ऑफ माईन्स तसेच कोळसा खनिजासाठी, कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांनी मंजूर केलेल्या वार्षिक खाणकाम आराखड्यानुसारच प्रत्येक प्रमुख खनिजाच्या खाणपट्टयातून खनिज उत्खनन केले जाते. मंजूर खाणकाम आराखड्यानुसार केलेले उत्खनन, त्यावरील स्वामित्वधन व अन्य शासकीय महसूल राज्य शासनाच्या ILMS प्रणालीमध्ये ताळमेळ घेवून खनिपट्टाधारकास वाहतूक परवाना ऑनलाईन प्रणालीद्वारे निर्गमित होतो. तसेच शासनास प्राप्त होत असलेली रॉयल्टीची रक्कम आगाऊ भरणा करुन घेतली जात असल्याने, खाणपट्टाधारक जास्तीचे खनिज उत्खनन करु शकत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष खनिज उत्खनन व प्राप्त महसूल यामध्ये गैरव्यवहार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवी (ता. भिवापूर, जि. नागपूर) येथील शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(१४) * ३१३३४ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवी (ता.भिवापूर, जि.नागपूर) येथील शेतकऱ्यांचे शेतजमिनीचे पट्टे नावावर करून देण्याच्या उद्देशाने एका दलालाने २६ शेतकऱ्यांबरोबर आर्थिक व्यवहार करून रूपये १३ लाख ३० हजार इतक्या रकमेची फसवणूक केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणात २६ शेतकरी लाभार्थ्यांना प्रत्येकाच्या नावे शेतजमिनीचा स्वतंत्र सातबारा मिळवून देतो असे सांगून शेतकऱ्यांकडून तीन टप्यात एकूण रूपये १३ लाख ३० हजार इतक्या रकमेचा गैरव्यवहार केल्याबाबत बेला पोलिस ठाण्यात लेखी तक्रार करुन कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह शेतकऱ्यांची रक्कम परत मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पोलीस स्टेशन बेला, जि. नागपूर (ग्रामीण) अंतर्गत मौजा भिवी, ता.भिवापूर, जि. नागपूर येथील सर्वोदय सहकारी सामुदायिक शेती सोसायटीच्या नावावर असलेली भुमापन क्र.२०१, भोगवटादार वर्ग-२, एकूण १०७ हेक्टर आराजी असलेल्या शेतजमिनीबाबत सोसायटीच्या ३२ सदस्यांपैकी २६ सदस्यांना त्यांच्या नावाने स्वतंत्र पट्टे व सातबारा उतारे करून देण्याचे आमिष दाखवून आरोपीने दिनांक २४.०१.२०२२ ते १४.०६.२०२२ या कालावधीत संबंधित २६ सदस्यांकडून एकूण रुपये १३,३०,०००/- रक्कम स्वीकारुन फसवणूक केली आहे.

दिनांक १९.०३.२०२५ रोजी अर्जदार यांचा तक्रार अर्ज पोलीस स्टेशन बेला जि.नागपूर (ग्रामीण) येथे प्राप्त झाला होता. सदर तक्रार अर्जाची सखोल चौकशी करून आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर (ग्रामीण) यांच्याकडून कागदपत्रांची पडताळणी व गुन्हा दाखल करण्यास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर फिर्यादी यांच्या मौखिक तक्रारीवरुन, सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बेला, जि.नागपूर (ग्रामीण) येथे दिनांक ३०.१२.२०२५ रोजी भारतीय दंड संहिता कलम ४०६, ४२० अन्वये अप.क्र. ५३३/२०२५ नोंद करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी आरोपीस दिनांक १४.०२.२०२६ रोजी अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाकडून पी.सी.आर. (पोलीस कस्टडी रिमांड) मंजूर करण्यात आला होता. त्यादरम्यान आरोपीकडून रोख रुपये ४०,०००/- जप्त करण्यात आले आहेत.

तसेच आरोपीचे बँक स्टेटमेंट प्राप्त करून त्याचे बँक खाते गोठविण्याबाबत Canara Bank, जरीपटका, नागपूर यांच्याशी तसेच, स्थावर मालमत्तेबाबत माहिती मिळविण्यासाठी दुय्यम निबंधक, पारशिवनी यांच्याकडे दिनांक १६.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये पत्रव्यवहार करण्यात आला आहे. साक्षीदार व पीडितांचे सविस्तर जबाब नोंदविण्यात आले असून आरोपीविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

तसेच आरोपीविरुद्ध इश्तेगाशा क्र.०८/२०२६, भा.ना.सू.सं. कलम १२९(ड) (ई) (ग) अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदस्यांची रक्कम परत मिळवून देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेरुर (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील श्री देव कलेश्वर देवस्थान येथे झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१५) * २४०८५ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुर (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील श्री देव कलेश्वर देवस्थान येथे येणाऱ्या भविकांमार्फत मोठ्या प्रमाणात वर्गणी जमा होत असल्याने देवस्थानाकडे स्थावर व जंगम मालमत्ता जमा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त देवस्थानाच्या उप सल्लागार समितीने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्यासंदर्भात प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांच्याकडे दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पत्राद्वारे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त गैरव्यवहारासंदर्भातील तक्रारदारांची संख्या व तक्रारीची तीव्रता लक्षात घेता स्थानिक नागरिकांनी दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी आंदोलन देखील केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी सदोष निवड/नेमणूक प्रक्रिया स्थगित करून गैरव्यवहाराबाबत देवस्थान व्यवस्थापन समिती व जबाबदार उपसमिती सदस्य यांची सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने देवस्थानाचा कारभार सुस्थितीत चालण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

श्री देव कलेश्वर देवस्थान, नेरूर, ता.कुडाळ,जि.सिंधुदुर्ग हा न्यास सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे ए-१३७/सिंधुदुर्ग या क्रमांकाने नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. सदर देवस्थानचे व्यवस्थापन हे देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांची उप सल्लागार समिती पाहत आहे. सदर उप सल्लागार समितीच्या अधिपत्याखाली एकूण आठ देवस्थाने येतात. सदर देवस्थानाकडे निधी/देणगी/वर्गणी जमा होते. तसेच देवस्थानकडे मौजे नेरूर तर्फे हवेली, कुंडगांव, साईगांव, रायगांव व देऊळवाडा नेरूर या गावात मोठ्या प्रमाणात स्थावर मालमत्ता आहे. सदर देवस्थानाकडे दाग- दागिने, सोने, चांदी इ.वस्तू आहेत.

सदर देवस्थानाने सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, नेरूर आणि सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा नेरूर येथे एकूण ०६ मुदत ठेवी ठेवलेल्या आहेत. सदर मुदत ठेवींमध्ये एकूण ३७,०५,५००/- रुपये आहेत. तसेच

देवस्थानची सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, नेरूर आणि सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा नेरूर येथे एकूण ०४ बँक खाती आहेत. त्यामध्ये अंदाजे एकूण रक्कम रु.५५,०२,१४४/- शिल्लक असल्याचे दिसून येते.

(२) होय, हे खरे आहे.

याबाबत प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांचे कार्यालयामध्ये दि.०८/११/२०२५, दि.१८/१२/२०२५ व दि.२३/०१/२०२६ रोजीचे तक्रारअर्ज प्राप्त असून सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सचिव, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, जि.कोल्हापूर यांचेकडून दि.२४/१२/२०२५ च्या पत्रान्वये आणि दि.०९/०१/२०२६ व दि.१०/०२/२०२६ च्या स्मरणपत्रांन्वये अहवाल मागविला आहे. अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

देवस्थान व्यवस्थापन समितीने दिनांक २६/१२/२०२४ रोजी सभा घेण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला विरोध करण्यासाठी आपण दिनांक २६/१२/२०२४ रोजी ऑफिसर इनचार्ज कार्यालय, सावंतवाडी येथे उपोषणास बसणार असल्याचे श्री.सुहास सुधाकर नेरुरकर यांनी पत्र दिनांक २०/१२/२०२४ नुसार कळविले होते. श्री.सुहास सुधाकर नेरुरकर यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेल्या मुद्यांबाबत चौकशी सुरु असल्याने त्यांनी उपोषण मागे घ्यावे असे पत्र सचिव, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांनी दिनांक २४/१२/२०२४ रोजी त्यांना दिले.

(४) ऑफिसर इनचार्ज देवस्थान व्यवस्थापन समिती, उप कार्यालय, सावंतवाडी सदोष प्रक्रिया राबवित असलेबाबत श्री.मुरलीधर केशव मतकरी यांनी सचिव, देवस्थान समिती यांचेकडे दिनांक ३१/१२/२०२४ रोजी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची चौकशी करण्यात आली. चौकशी मधील दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या निर्णयानुसार सदर प्रकरणात समितीचे अध्यक्ष यांची निवड प्रक्रिया नियमावलीप्रमाणे झालेली असल्याने ती स्थगित केलेली नाही. परंतु, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांच्या मागच्या कालावधीतील उप समितीचे अध्यक्ष यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत चौकशी करण्याकरीता समितीकडील लेखापरीक्षक यांची नेमणूक केली आहे. तसेच उप समितीने केलेल्या बांधकाम खर्चाबाबत कार्यालयाकडील उप-अभियंता यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. सदर चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहेत. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. सचिव, देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/१२/२०२४ रोजी श्री.कलेश्वर मंदिरात सभेचे आयोजन करण्यात आले. समितीच्या उपसमिती नियुक्ती नियमावलीनुसार श्री.चारुदत्त देसाई यांचे अध्यक्षतेखाली १४ लोकांची उप-समिती नियुक्त करण्यात आली असून देवस्थानचा कारभार त्यांचेमार्फत चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ट्रेड विथ जॅझ (टीडब्ल्यूजे) असोसिएट्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने केलेली फसवणूक

**(१६) * २९८६८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ट्रेड विथ जॅझ (टीडब्ल्यूजे) असोसिएट्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने शासनाच्या प्रकल्पांसाठी मोठे कंत्राट मिळविण्याचा दावा करुन तसेच अनेक नामांकित लोकांना गुंतवणुकीवर उच्च परतावा देण्याचे आमिष

दाखवून सुमारे ११ हजार लोकांची रूपये १५०० कोटी इतक्या रकमेची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अनेक गुंतवणूकदारांनी टीडब्ल्यूजे कंपनी व संचालकांविरोधात विविध ठिकाणी गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदरहू प्रकरणातील टीडब्ल्यूजेचा मालक, व्यवस्थापकीय संचालक व संचालक या तिघांना अटक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) ट्रेड विथ जॅझ असोशिएटस प्रा.लि. या कंपनीने तिच्या सहयोगी कंपन्यामार्फत गुंतवणूकदारांना त्यांनी गुंतवलेल्या रक्कमेवर मासिक ३ ते ५ टक्के व्याजदराचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांकडून ठेवी स्विकारुन गुंतवणूक केलेली रक्कम तसेच त्यावरील व्याज व परतावा न देता गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे आढळून आले आहे. प्रस्तुत कंपनी व तिच्या सहयोगी कंपन्यानी केलेल्या फसवणूकीच्या अनुषंगाने राज्यात ०८ पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल केले असून आठ पोलीस ठाण्यामध्ये दाखल झालेल्या गुन्हयांमध्ये मिळून एकूण १३४० गुंतवणूकदारांची रुपये १२३,३२,०४,२०३/- एवढया रक्कमेची फसवणूक केल्याचे निष्पण झाले आहे.

ठाणे शहर, नवी मुंबई, यवतमाळ पोलीस घटक यांचेकडे असलेल्या गुन्हयांच्या तपासामध्ये "ट्रेड विथ जॅझ" या कंपनीचे संचालक श्री.समीर नार्वेकर, श्रीमती नेहा नार्वेकर, श्री.अमित बालम यांना अटक केली आहे. सदर आरोपी हे सध्या न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत.

वर नमूद गुन्हयांमध्ये आतापर्यंत एकूण ७,८०,५५,१००/- रूपयांची मालमत्ता संरक्षित करण्यात आली आहे. तसेच पोलीस घटकांकडून आरोपी यांचे नावाने असलेल्या इतर मालमत्तांची माहिती प्राप्त करण्यात येत असून गुंतवणूकदारांना पैसे परत करण्याकामी महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियमान्वये प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. सदर प्रकरणी गुंतवणूकदारांची रक्कम परत करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ मधील तरतुदीनुसार आरोपींची मालमत्ता जप्त करुन सक्षम प्राधिकारी नियुक्त करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त होताच त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे संकल्पीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे मोरे (ता.वसई, जि.पालघर) येथील जमीन मालकाच्या नावे जमा करण्यात आलेल्या रकमेत केलेला गैरव्यवहार

**(१७) * ३२२०१ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोरे (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं.१२१, क्षेत्र १.१५.० हे.आर. या जमीन मालकांच्या नावे मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पामार्फत भूसंपादनासाठी वसई येथील कोटक महिंद्रा बँकेच्या शाखेत जमा करण्यात आलेली रुपये २१ कोटी इतकी रक्कम परस्पर अन्य व्यक्तीच्या नावे वळविण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९५ मध्ये शासन जमा करण्यात आलेली ही जमीन सन २०१८ मध्ये सुमारे २३ वर्षांनी उपविभागीय अधिकारी, वसई यांनी आर.टी.एस. अपील क्र. ७९/२०१८ अन्वये पुन्हा जमीन मालकांच्या नावे करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणातील जमीन मालक असलेल्या महिलेच्या अशिक्षितपणाचा गैरफायदा तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे महिलेच्या नावे बँकेत खाते उघडून, तिच्या नावे स्वतंत्र भ्रमणध्वनी क्रमांक घेऊन त्या आधारे भूसंपादनाची बँक खात्यातील रक्कम परस्पररित्या श्री.उमेश हरिहर राणा या खातेदाराच्या खात्यात वळती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी फसवणूक झालेल्या महिलेने दिनांक १ मार्च, २०२५ रोजी पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांच्याकडे लेखी तक्रार देऊनही अद्यापपर्यंत संबंधितांविरुद्ध कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह महिलेला रक्कम परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पाकरिता मौजे मोरे, नालासोपारा (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथील सर्वे नंबर १२१, क्षेत्र १.१६.८० हे. आर पैकी क्षेत्र ०.०८.८० हे.आर. जमीन संपादीत केली. सदर संपादीत जमीनीचा श्रीम.माया चव्हाण यांचे नावे संमती निवाडा घोषित करण्यात येवून त्यांनी संमती दिल्यानुसार व दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातील नमुद एचडीएफसी बँकेचे खात्यावर सदर जमिनीची नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यात आली. जमीनीच्या भूसंपादनाची सुमारे २२ कोटी रुपये इतकी रक्कम आरोपी उमेश राणा याने परस्पर स्वत:च्या खात्यात वळवून फसवणूक केल्याप्रकरणी फिर्यादींनी दि.११.०२.२०२६ रोजी केलेल्या तक्रार अर्जावरुन पेल्हार पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय येथे दि.२८.०२.२०२६ रोजी गु. र. क्र.१२३/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१६(५), ३१८(४), ६१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) मौजे-मोरे, ता.वसई येथील स.नं. १२१ या मिळकतीबाबत दि.०५.०१.१९९५ रोजीच्या आदेशान्वये जगन्नाथ कृष्णा मढवी व इतर ४ यांना शेती लागवडीकरिता दिलेली असून जमीन सक्षम प्राधिकारी यांची पूर्वपरवानगी न घेता अन्य इसमांना विकल्याने शर्तीचा भंग केल्याने जमीन सरकार जमा केल्याची ७/१२ ला फेरफार क्र.४०२ अन्वये नोंद केली.

तदनंतर आरटीएस अपिल नं. ७९/२०१८ दिनांक १४/०५/२०१९ लगत ता.हु.नं. महसूल / क १ / टे २/ ५५८८/कावि ४७६३/२०१९ दिनांक २६/०६/२०१९ नुसार पुर्वीचा निळेमोरे जुना फेरफार क्रमांक ४०२ रद्द करण्यात येवून फेरफार क्र. आदेश.१४७८ अन्वये जगन्नाथ कृष्णा मढवी (मयत) व इतर वारसांच्या नोंदी करण्यात आल्या.

हक्कसोडपत्रान्वये उपरोक्त जमिनीतील जयवंती जगन्नाथ मढवी ऊर्फ जाधव कु. मु. म्हणून राणा व इतर ८ यांनी आपला संपूर्ण हिस्सा माया पद्मण चव्हाण यांच्या नावे मा.दु.निबंधक वसई ५ यांचेकडील दिनांक १६.०८.२०१९ रोजीच्या दस्त क्रमांक ६५८४/२०१९ अन्वये केला. त्यामुळे सदर जमिनीकरिता माया पद्मण चव्हाण यांचे नावे फेरफार क्र.१४९१ नोंद करण्यात आला.

याप्रकरणी, उपविभागीय अधिकारी, वसई यांचे दिनांक १४.०५.२०१९ रोजीचे आदेशाचे पुनर्विलोकन करण्यात आले असुन तत्कालीन उपविभागीय अधिकारी, वसई यांच्या दिनांक ०८/०४/२०२४ रोजीच्या

आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, वसई यांचे दिनांक १४.०५.२०१९ रोजीचे आदेश कायम करण्यात आले आहेत.

(३) फिर्यादी महिलेच्या अशिक्षितपणाचा गैरफायदा घेऊन फिर्यादींच्या जमीनीच्या भूसंपादनाची रु.२२,३१,११,७७४/- इतकी रक्कम कोटक महिंद्रा बँक व एचडीएफसी बँकेच्या खात्यात जमा होताच फिर्यादींच्या संमतीशिवाय आरोपी उमेश हरीहर राणा याने स्वत:च्या बँक खात्यात वळती करुन काढून घेतली. याकरिता फिर्यादींच्या नावावर नवीन सीम कार्ड घेऊन ते फिर्यादींच्या बँक खात्यांना लिंक करुन परस्पर व्यवहार करुन फिर्यादींची फसवणूक करण्यात आली.

(४) अर्जदार महिला माया चव्हाण यांनी जमीनीच्या व्यवहारात ठरलेले पैसे मागितल्यामुळे आरोपीत भुमाफियानी अर्जदार यांच्या पतीवर वसई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३०४/२०२२ गुन्हा गुन्हा रद्द करण्याबाबत व फसवणुकीची रक्कम परत मिळणेबाबत दि. ०२ मार्च २०२५ रोजीच्या अर्जान्वये विनंती केली आहे.

तथापि फिर्यादी व तिच्या पतीविरूध्द वसई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३०४/२०२२ भा.द.वि.सं कलम ३८४,३४,३८५,३८६,५०४ प्रमाणे दाखल गुन्हयामध्ये तपासाअंती दि.३०.१२.२०२३ रोजी ०६ आरोपीविरूध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे.

तसेच सदर तक्रार अर्जात नमूद केलेला गु. र. क्र.३०४/२०२२ रद्द करण्याबाबत अर्जदार महिलेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र.३०९५/२०२४ दाखल केली असून सदर प्रकरणाची पुढील सुनावणी दि.०९/०४/२०२६ रोजी होणार आहे. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधिन राहून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सबब सदरचा अर्ज तात्पुरत्या स्वरुपात दप्तरी दाखल करण्यात आलेला आहे.

(५) फिर्यादी महिला यांनी दि.११.०२.२०२६ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाची चौकशी करुन ०८ आरोपींविरुध्द पेल्हार पोलीस ठाणे येथे दि.२८.०२.२०२६ रोजी गु. र. क्र.१२३/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ०४ आरोपींनी मा.सत्र न्यायालय, वसई येथे अटकपूर्व जामीनासाठी केलेल्या अर्जावर सुनावणी सुरू आहे. उर्वरित ०४ आरोपींचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ (दीपनगर) (जि.जळगांव) तालुक्यातील औष्णिक विद्युत केंद्रात ‘पॉंड ॲश’ विक्री लिलाव प्रक्रियेमध्ये झालेली अनियमितता

**(१८) * ३१७१३ श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (दीपनगर) (जि.जळगांव) तालुक्यातील औष्णिक विद्युत केंद्रात ‘पॉंड ॲश’ विक्रीसाठी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ई-लिलाव (e-Auction) प्रक्रिया राबविण्यात आली असून सदर लिलावात ‘कृष्णा इंटरप्रायझेस’ आणि ‘साई इन्फ्रा’ या कंपन्यांनी सर्वाधिक (H१) रु.६३१ प्रति मेट्रिक टन दर दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी लिलाव यशस्वी होऊन बिडर्सनी अनामत रक्कम भरलेली असतानाही मुख्य अभियंता व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कोणताही पुरावा नसताना दिनांक ३१ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान लिलाव अचानक रद्द केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानिर्मितीच्या मुख्य कार्यालयातील ‘कार्यकारी संचालक’ (Environment & Safety) हे गत १५ वर्षापासून लिलाव रद्द करण्याचे वारंवार निर्णय घेत असल्याने सदरहू राख एका खाजगी कंपनीला केवळ रु.१९३ प्रति टन दराने विक्री केल्यामुळे महानिर्मितीला प्रति टन रु.४३८ म्हणजेच सुमारे रु.३५.८३ कोटींचे वार्षिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने निश्चित केलेल्या महसुलाचे नुकसान करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर (मुख्य अभियंता व कार्यकारी संचालक) कठोर कारवाई करण्यासह रु.१९३ या जुन्या दराऐवजी रु.६३१ हा सर्वोच्च दर स्वीकारुन महसूल वाचविण्यासाठी लिलाव प्रक्रिया किंवा मूळ H१ बिडर्सना काम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

'कृष्णा इंटरप्रायझेस','विभु सप्लायर' आणि 'साई इन्फ्रा' या कंपन्यांनी रु.६३२ प्रति मेट्रिक टन इतक्या सर्वोच्च (H१) दराची बोली लावली होती.
(२) सदर लिलाव प्रक्रियेत एकूण ११४ बिडर्सनी भाग घेतला होता त्यापैकी प्राथमिक फेरीत ५८ बिडर्स पात्र ठरले होते. सदर पात्र बिडर्सच्या कागदपत्रांची सविस्तर तपासणी केली असता केवळ २९ बिडर्स पात्र ठरले.

सदर पात्रता धारकांच्या कागदपत्रांची तपासणी करताना अनियमिततेच्या तक्रारी प्राप्त झाल्याने संपूर्ण लिलाव प्रक्रियेची फेरतपासणी करण्याकरिता, महानिर्मिती कंपनीच्या सांघिक कार्यालयाने दिनांक २१.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये स्वतंत्र चौकशी समिती नियुक्त केली. सदर चौकशी समितीने दिनांक २७.०१.२०२६ रोजी दिलेल्या अहवालानुसार सदर लिलाव प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे.
(३) सदर लिलाव प्रक्रिया केंद्र शासनाच्या दिनांक ३१.१२.२०२१ रोजीच्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार महानिर्मिती कंपनीच्या सांघिक कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली सन-२०२३ मध्ये राबविण्यात येत होती. त्यावेळी पुढीलप्रमाणे दर प्राप्त झालेले होते :-

| **औ.वि.केंद्र (TPS)** | **निश्चित झालेला दर (रु./मे. टन)** |
|---|---|
| नाशिक | ५५८/- |
| परळी | ३५३/- |
| भुसावळ | १९३/- |
| पारस | ४१९/- |

चौकशी समितीच्या दिनांक २७.०१.२०२६ रोजीच्या अहवालानुसार वरील लिलाव प्रक्रिया रद्द करण्यात आली असल्यामुळे शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही.
(४) सदर लिलाव प्रक्रिया रद्द झाल्यामुळे 'कृष्णा इंटरप्रायझेस आणि 'साई इन्फ्रा' या कंपन्यांनी महानिर्मिती कंपनी विरूद्ध मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केलेली आहे. त्यावर मा.न्यायालयाचा निर्णय झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात निर्मल सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेच्या नावाने नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(१९) * ३२१७५ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात निर्मल सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेच्या नावाने ५६ व्यक्तींची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी श्री.रोहित सिद्धार्थ जांभुळकर या इसमाविरुद्ध अंबड पोलीस ठाणे व आर्थिक गुन्हे शाखा येथे दिनांक १४ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नागरिकांच्या झालेल्या फसवणुकीच्या संदर्भात एफ.आय.आर. नोंदविण्यात आलेला असून त्यानुषंगाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर गुन्ह्यातील आरोपी यांनी शेअर मार्केट ट्रेडींगचे ऑफिस सुरु करुन ते सेबी कडे रजिस्टर असल्याचे भासवून त्याद्वारे फिर्यादी यांना निर्मल बंग प्रा.लि. कंपनीत फॅरेक्स ट्रेडींगमध्ये गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवले.

तसेच निर्मल बंग प्रा.लि. कंपनीचे बनावट लेटरहेड व बनावट स्टेटमेंट तयार करुन सदरच्या कंपनीत फॉरेक्स ट्रेडींग गुंतवणूक करुन १० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून सदर गुन्ह्यातील फिर्यादी व इतर गुंतवणूकदार यांच्याकडून वेळोवेळी रोख स्वरुपात, चेकद्वारे व एनईएफटी द्वारे रक्कम घेऊन रु.२७,०२,०००/- इतक्या रकमेची फसवणूक केली. त्यामुळे सदर प्रकरणी फिर्यादीनुसार सरकारवाडा पो.स्टे. येथे दिनांक १५.०३.२०२६ रोजी गु.र.नं. ७१/२०२६ भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३४०(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्याचे काम दिलेल्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२०) * २७६१५ श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २ कोटी २४ लाख ६१ हजार ३४६ ग्राहकांकडे स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्याचा महावितरणने निर्णय घेतला असून त्यासाठी मे.मॉन्टेकार्लो, मे.अदाणी, मे.नागार्जुन कन्स्ट्रक्शन कंपनी आणि मे.जिनस या चार कंपन्यांना विविध भागातील रूपये २६ हजार ९२३.४६ कोटी इतके कंत्राट देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी दिलेले काम खाजगी कंपन्यांकडून होत नसल्याने कराराचा भंग करून महावितरण कर्मचाऱ्यांवर सदर काम लादले जात असून याविरोधात महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने थेट महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे तक्रार करून संबंधित कंपन्यांचे कंत्राट रद्द करून त्यांना काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने करारामधील अटी व शर्ती भंग करणाऱ्या कंपन्यांचे कंत्राट रद्द करून त्यांना काळ्या यादीत टाकण्याच्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक १७.०८.२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविण्याचे सुचित करण्यात आले आहे.

केंद्रशासनाने निर्गमित केलेल्या प्रमाणित निविदेतील (Standard Biding Document) तरतुदी नुसार महावितरणद्वारे पारदर्शकरित्या कार्यवाही करून स्पर्धात्मक पद्धतीने निविदा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. निविदेतील अटी व शर्ती नुसार पात्र मे.अदाणी, मे.एनसीसी, मे.मॉन्टेकार्लो व मे.जिनस या ०४ निविदाधारकांना कार्यादेश देण्यात आले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) ग्राहकांना वेळेत वीज पुरवठा करून योग्य सेवा देण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांमार्फतही काही ग्राहकांना मीटर बसविण्यात आले आहेत. महवितरणच्या कर्मचाऱ्यांनी लावलेल्या स्मार्ट मीटरसाठी AMISP ला देय असलेल्या रकमेत कपात करण्यात आली असून, आजतागायत एकूण रु.१३.८६ कोटी इतकी रक्कम AMISP च्या बिलामधून कपात करण्यात आली आहे. तसेच सद्या सर्व ग्राहकांना AMISP मार्फतच मीटर बसविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात तलासरी पोलिसांनी बेकायदेशीररित्या मद्य वाहतूक करणारा टेम्पो पकडल्याबाबत

**(२१) * ३१९६९ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद महामार्गावर तलासरी पोलिसांनी ‘सिप्ला हेल्थ’ सारख्या नामांकित औषध कंपनीची बनावट देयके आणि बनावट कागदपत्रे तयार करुन बेकायदेशीर मद्य वाहतूक करणारा टेम्पो पकडला असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महामार्गावरील तपासणी नाके (Check posts) असूनही अशा प्रकारे बनावट कागदपत्रांच्या आधारे राज्याच्या सीमाभागातून अवैधरित्या माल आणण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मुंबई-अहमदाबाद महामार्गावर टेम्पोमध्ये सिप्ला हेल्थचे औषधांचे बॉक्स असल्याचे भासवून त्यामध्ये मद्य वाहतूक करताना दिनांक ०५.०२.२०२६ रोजी रात्री आढळून आल्याने त्याबाबत तलासरी पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र कायदा कलम ६५ (अ) ई नुसार दिनांक ०६.०२.२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये रुपये २६.२८ लाख किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच वाहन चालकास अटक केली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी ट्रॅव्हल्सच्या सुरक्षिततेसाठी व स्लीपर कोच बसच्या रचनेत बदल करण्याकरिता नवीन नियमावली तयार करणेबाबत

**(२२) * २४१३१ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात धावणाऱ्या खाजगी स्लीपर कोच बसच्या असुरक्षित रचनेमुळे वारंवार अपघात आणि आगीच्या घटना घडत असून अशा बसवर जगात अनेक ठिकाणी बंदी असताना भारतात त्या सुरू असून स्लीपर बसमध्ये मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेले अंतर्गत वायरिंग, ज्वालाग्राही पडदे व कुशन आणि आपत्कालीन दरवाजाचा

अभाव यामुळे बसने पेट घेतल्यास प्रवाशांना बाहेर पडणे अशक्य होऊन मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समृद्धी महामार्गावर दिनांक ६ जानेवारी, २०२६ रोजी स्लीपर कोच बसला अचानक आग लागून बस पूर्णतः जळून खाक झाली तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर मुंबईहून बुलढाण्याकडे जाणाऱ्या खाजगी स्लीपर कोच बसला लागलेल्या आगीत एका प्रवाशाचा मृत्यू आणि एक प्रवासी गंभीर जखमी झाला असल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्लीपर कोच बस टायर फुटणे, विद्युत यंत्रणेमधील बिघाड, चालकांचा थकवा, वेगमर्यादेचे उल्लंघन, रात्रीच्या वेळेस अपुरी तपासणी व देखरेख यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होवून परदेशात स्लीपर कोच बसेसवर निर्बंध असतानाही राज्यात अशा बसेस बेकायदेशीररीत्या चालविल्या जात असून, त्यामधूनच आग लागणे, अपघात होणे व प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यापूर्वी समृद्धी महामार्गावर दिनांक १ जुलै, २०२३ रोजी झालेल्या भीषण अपघातात २५ जणांचा मृत्यू झाल्यानंतर शासनाने अपघातांच्या कारणांचा अभ्यास करण्यासाठी विशेष समिती गठित केली होती, सदर समितीने समृद्धी महामार्गावरील बस प्रवासाची सुरक्षितता, वाहनांची रचना, स्लीपर कोच बसेस, चालकांचे प्रशिक्षण, वाहन तपासणी व आपत्कालीन व्यवस्थेबाबत केलेल्या शिफारशींवर अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, समृद्धी महामार्गावरील मागील भीषण अपघातांच्या पार्श्वभूमीवरही नियमांचे उल्लंघन करून अवैधपणे स्लीपर कोच बस चालविल्या जाणे ही बाब प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणारी आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने खाजगी ट्रॅव्हल्सच्या सुरक्षिततेसाठी आणि स्लीपर कोच बसच्या रचनेबाबत नवीन नियमावली तयार करण्यासह चीन व युरोपमधील देशांप्रमाणे स्लीपर कोच बसच्या रचनेत बदल करण्यासाठी किंवा निर्बंध आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४), (५) व (६) केंद्र शासन अधिसूचना क्र.G.S.R. १५९ (E) नुसार २२ किंवा त्यापेक्षा अधिक आसन क्षमता (चालक वगळता) असलेल्या बसचे बॉडी बिल्डींग AIS-१५३ प्रमाणे असणे आवश्यक आहे. तसेच अशा सर्व वाहनांच्या प्रोटोटाईपला केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १२६ मध्ये नमूद मान्यता प्राप्त संस्था यांच्याकडून मान्यता घेणे आवश्यक आहे.

दिनांक ०१.०९.२०२५ नंतर नोंदणी करिता येणाऱ्या सर्व बसेसची नोंदणी ही केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ मधील सुधारित तरतूदीमधील नियम व मानांकनानुसार (AIS-१५३) बॉडी बिल्डिंग तसेच Type Approval व इतर तांत्रिक अटींची पूर्तता केली असल्याची खात्री करुनच नोंदणी करण्यात येत आहे.

स्लीपर कोच बसची नोंदणी करताना, तसेच योग्यता प्रमाणपत्र जारी करताना, केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १२५ (C) मधील सुधारीत तरतुदीनुसार AIS:-११९ व AIS:- ०५२ मधील अटी व मोजमापाप्रमाणेच पुनर्तपासणी करण्याबाबतच्या आणि प्रतिबंधित संरचनात्मक बदल असल्यास तो काढून टाकण्याबाबतच्या सूचना दिनांक १२.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांना जारी करण्यात आल्या आहेत.

दिनांक ०१.०७.२०२३ रोजी पिंपळखुटा, जि.बुलढाणा येथे समृध्दी महामार्गावर अपघात होऊन २५ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी परिवहन विभाग आणि पोलीस विभागातील अधिकारी यांचा समावेश असलेली ४ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशींमध्ये आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याचा मार्ग चिन्हांकित करणे, चालकांची अल्कोहोल टेस्ट करणे, बस चालक व बस मालक यांचे मोबाईल नंबर व इतर तपशील बसेसवर दर्शविणे, वाहन तपासणी व वाहन चालकांचे समुपदेशन करणे, या शिफारशींचा समावेश आहे. सदर समितीने केलेल्या शिफारशींबाबतची कार्यवाही, समन्वय व त्याबाबतची अंमलबजावणी रस्ता सुरक्षा कक्ष, परिवहन आयुक्त कार्यालय यांचेकडून करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यात माहे एप्रिल, २०२५ ते माहे जानेवारी, २०२६ या कालावधीत एकूण ८१,४४२ इतक्या वाहनांची तपासणी करण्यात येऊन, त्यापैकी दोषी आढळलेल्या १३,१२८ खाजगी बसेसवर कारवाई करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील शेळी-मेंढी पालन संस्थांमध्ये पिग्मी व्यवहारांचे लेखापरीक्षणाअभावी आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * ३१५६२ श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) परिसरातील शेळी-मेंढी पालन संस्थेचे मागील आठ वर्षांपासून वैधानिक लेखापरीक्षण झाले नाही तसेच पिग्मी व्यवहारांमध्ये सुमारे ५० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैधानिक लेखापरीक्षण न झाल्यामुळे संस्थेच्या आर्थिक व्यवहारांवर योग्य नियंत्रण राहिले नसल्याने सभासद व नागरिकांच्या ठेवी धोक्यात आल्या असून शासनाच्या नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित संस्थांमध्ये वेळोवेळी तपासणी, लेखापरीक्षण व देखरेख न केल्यामुळे पिग्मी एजंट व पदाधिकाऱ्यांकडून आर्थिक गैरव्यवहार, फसवणूक व निधीचा अपव्यय होत असल्याची तक्रार माहे जानेवारी २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गैरव्यवहारामुळे अनेक गरीब शेतकरी, पशुपालक व सामान्य नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले असून सहकारी व बचत संस्थांवरील विश्वास कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेळी-मेंढी पालन संस्थांमधील पिग्मी गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह सर्व संबंधित संस्थांचे नियमित लेखापरीक्षण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) श्री महालक्ष्मी भटकी जमात शेळी मेंढी पालन व उत्पादन सहकारी संस्था, मर्या., मिणचे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या संस्थेचे दिनांक ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०२५ या आठ वर्षाच्या कालावधीत वैधानिक लेखा परीक्षण झालेले नाही.

संस्थेचे पदाधिकारी व सचिव यांनी संस्थेच्या ठेवीदारांची व पिग्मी धारकांची रक्कम देणेस टाळाटाळ केलेबाबतचा तक्रार अर्ज आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास कार्यालयास दिनांक १३.०१.२०२६ मध्ये प्राप्त झालेला आहे.

(४), (५) व (६) सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३०.०१.२०२६ रोजी संस्थेचे संचालक मंडळ व तक्रारदार यांची संयुक्त सुनावणी घेवून, ठेवीदारांचे व पिग्मी धारकांची ठेव परत करणेबाबत निर्देश देण्यात आले. त्यानुसार माहे फेब्रुवारी, २०२६ अखेर पर्यंत ठेवीदार यांना रु.६,७५,७४६/- इतकी ठेव परत करण्यात आली आहे. उर्वरित ठेवीदारांच्या ठेवी संस्थेच्या कर्जदारांकडून कर्ज वसूल करुन परत करण्यात येतील.

-----------------

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील काशीमिरा गावात अवैध गौण खनिज (वाळू) वाहतूक करणाऱ्यांकडून शासकीय अधिकाऱ्यांवर हल्ला केल्याबाबत

**(२४)** * **२६३२० श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील काशिगाव गावात अवैध गौण खनिज (वाळू) वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी गेलेले नायब तहसिलदार व त्यांच्या पथकावर वाळू माफियांनी हल्ला केल्याची घटना माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी काशिगाव पोलीस ठाणे येथे ७ अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गुन्ह्याच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २४ डिसेंबर, २०२५ रोजी रात्री पहाटे ०२.०० वाजता मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील काशिगाव या गावाजवळील हॉटेल पाली व्हिलेज समोर गुजरात-मुंबई हायवेवर अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिपर ट्रक वर कारवाई करण्यासाठी गेलेल्या नायब तहसिलदार श्री.प्रथमेश भुरके व त्यांच्या दोन पंचांना अवैध वाळू वाहतुकदारांनी शिवीगाळ, धमक्या व मारहाण केली व वाहनांसह पळून गेले.

(२) होय, या घटनेबाबत ७ अनोळखी व्यक्तींविरुद्ध काशिगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. ५९०/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३२,११५ (२), ३५२, ३ (५), ३०३ (२), १९१ (२), १९१ (३), १९० सह महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७), (४८) (८) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

(३) होय, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान एक टाटा हायवा टिपर ट्रक, एक मारुती सुझुकी ब्रीझा आणि एक मारुती स्वीफ्ट ही तीन वाहने जप्त करण्यात आली आहेत

या गुन्ह्यात एकूण ५ निष्पन्न आरोपी आणि २ अनोळखी व्यक्तींचा समावेश असून, निष्पन्न पाचही आरोपींना मा. उच्च न्यायालय, मुंबई कडून दिनांक २३/०२/२०२६ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे

गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून दोषारोपपत्र सादर करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे पोलमवाडी (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत**

**(२५) * ३१९०३ श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पोलमवाडी (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे जिल्हा नियोजन समिती, सोलापूर अंतर्गत हुलगे-काळे-पिसाळ वस्ती येथे सन २०२३-२४ मध्ये सिंगल फेज लाईटचे पोल मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे काम न करता ठेकेदार कंपनीने संबंधित अधिकाऱ्यांना हाताशी धरुन देयके मंजूर करुन घेतली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरीता संबंधित ग्रामपंचायतीकडून वारंवार मा.उप कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय यांचेकडे मागणी करुनही संबंधित अधिकारी सदर प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने सरपंच, ग्रामपंचायत पोलमवाडी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ३ जून, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनान्वये तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

तथापि, सदर ग्रामपंचायतीचे नाव पोलमवाडी असे नसून, पोमलवाडी, ता.करमाळा, जि.सोलापूर असे आहे.

(२) हे खरे नाही.

सदरचे काम ठेकेदारामार्फत माहे-सप्टेंबर, २०२४ मध्ये पूर्ण करण्यात आले असून, त्याचे देयक अद्यापपर्यंत सादर करण्यात आलेले नाही.

(३) सदरच्या कामाबाबत ग्रामपंचायत पोमलवाडी यांचे दिनांक ३०.०४.२०२५ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले होते.

(४) महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता, केत्तुर यांनी दिनांक २३.०४.२०२५ रोजी याबाबत पाहणी करुन, दिनांक २४.०५.२०२५ अन्वये त्याचा अहवाल सादर केलेला आहे. सदरच्या तपासणी अहवालानुसार प्रत्यक्ष झालेल्या कामकाजात कोणतीही अनियमितता आढळून आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील वनपाल व वनरक्षक यांना स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांनी अटक केल्याबाबत**

**(२६) * २३१९२ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील मोडक सागर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील वाळूची वाहतूक वन विभागाच्या संरक्षित क्षेत्रातून करण्यास परवानगी देण्यासाठी रूपये २ लाख १० हजार इतकी लाच घेताना वनपाल, श्री.भगवान जयराम भोईर आणि वनरक्षक, श्री.नितेश हुकूमचंद राठोड यांना खर्डी-वाडा मार्गावरील बागेचा पाडा येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या पडताळणीअंती आलोसे क्र.१, वनपाल व आलोसे क्र.२, वनरक्षक, परिमंडळ वन अधिकारी, काष्टी, खर्डी, शहापूर, ठाणे यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान रु.२,१०,०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारतांना आलोसे क्र.१, वनपाल यांना रंगेहात पकडून अटक करण्यात आली.

सदर दोन्ही आरोपीतांविरुद्ध शहापूर पोलीस स्टेशन, ठाणे (ग्रामीण), येथे गु.र.नं १२/२०२६ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियय १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ अन्वये दिनांक १०.०१.२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी दोन्ही आलोसे यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे. त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची जागृती ऍग्रो फुड् ॲन्ड इन्फ्रा प्रा.ली. या कंपनीने आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(२७)** * **२९७५८ श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांची सांगली येथील जागृती ऍग्रो फुड् ॲन्ड इन्फ्रा प्रा.ली. या कंपनीकडून शेतीपालनाच्या नावाने कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सविस्तर चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे माहे जुलै, २०२५ मध्ये पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह उक्त जिल्ह्यातील गुंतवणूकदार शेतकऱ्यांची गुंतवणुकीची रक्कम परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) जागृती ऍग्रो फुड् ॲन्ड इन्फ्रा प्रा. ली. या कंपनीने शेळीपालन उद्योगात पैसे किंवा शेळीच्या स्वरूपात गुंतवणूक केल्यास रोख रक्कम किंवा शेळी या स्वरूपात चार ते दहा पट परतावा तसेच कंपनीत नोकरी देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने रामनगर पोलीस स्टेशन, जिल्हा चंद्रपूर येथे गुन्हा अप क्रमांक ८१९/२०१६ भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ३४ सह एमपीआयडी अधिनियमाच्या कलम ३ अन्वये दिनांक २३ जुलै २०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करत आहे. सदर गुन्ह्यात निष्पन्न ०४ आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी एकूण ११२४ गुंतवणूकदारांची रु.१०,७७,५९,३७६/- एवढया रकमेची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी गुंतवणूकदारांना रक्कम परत करण्यासाठी एमपीआयडी अधिनियमांतर्गत आरोपींच्या मालमत्ता जप्त करून सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणी गुंतवणूकदाराच्या रकमा तातडीने मिळणे बाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी २०२५ मध्ये शासनास विनंती केली आहे.

शासनास प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी मालमत्ता जप्तीबाबतची अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे,**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.